प्रकरण सहावे

# वा. ल. कुलकर्णी यांच्या टीकालेखनाचे विशेष

प्रकरण सहावे

# वा. ल. कुलकर्णी यांच्या टीका लेखनाचे विशेष

वा. ल. कुलकर्णी यांनी समीक्षणपर अनेक पुस्तके लिहिली. या सर्व पुस्तकांतून त्यांनी वाङ;मयासंबंधीचे विचार मांडलेले आहेत. वाङ;मयातील गुण-दोषांचे विवेचन केलेले आहे. वाङ;मयीन समस्यांची चर्चा केलेली आहे. टीकाकारांविषयी मते मांडून टीकेचे स्वरुप मांडलेले आहे. असे विषय आपल्या समीक्षणपर पुस्तकांत मांडून समीक्षेवर कालखंडाचा परिणाम कसा झाला व कालखंडानुसार समीक्षेचे विचार बदलत गेले. याचाही विचार केलेला दिसून येतो.

वा. लं. ची सर्व समीक्षणपर पुस्तके वाचल्यानंतर मला त्यांच्या समीक्षेचे निराळेपण लक्षात आले. हे विशेष जाणून घेण्यासाठी मला त्यांची सर्व समीक्षणात्मक पुस्तके वाचावी लागली. जसजसे विशेष जाणवले तस तसे मी नमूद केलेले आहेत.

समीक्षा लेखनाला औपचारिक रुप देण्याचे टाळलेले आहे. छोटी छोटी टिपणे तयार करणे व ती टीपणे परत तपासून निर्दोष करीत बसणे ही माझी सवय आहे. असली टिपणे औपचारिक लेखनापेक्षा अनेकदा व प्रस्तुत व टोकदार ठरतात. असा स्वत: वा. ल. चा अनुभव आहे. अनुभवाधारे वा. ल. समीक्षा लेखन करतात.

समीक्षणपर पुस्तकाच्या पाठीमागे परिशिष्ट्ये जोडलेली आहेत. पहिल्या परिशिष्टांत खाडिलकरांची नाट्यसृष्टी ज्या काळात उदयाला आली त्या काळातील एकंदर मराठी नाट्य लेखनाचे चित्र सदर नाट्यसृष्टीसंदर्भात लक्षात येते. त्यादृष्टिने एक आराखडा तयार केलेला आहे. म्हणजे समीक्षेचे आकलन चांगल्याप्रकारे होण्यासाठी योग्य ठिकाणी आराखडे तयार केलेले आहेत. खाडिलकर यांची नाट्यविषयक व साहित्यविषयक भाषणे त्यांच्या लेखन संग्रहाच्या दुसऱ्या भागत संग्रहित केलेली आहेत. त्यामध्ये त्यांनी १९०७ साली रंगभूमी मासिकाच्या पहिल्या अंकासाठी लिहिले होते. आणि त्यांच्या इतर महत्वाच्या साहित्यात भर घालून ते सर्व पुस्तक शेवटी दिलेले आहे. नाटकातील सर्व पात्रांचा उल्लेख केलेला दिसून येतो. समीक्षेची भाषा असून देखिल अतिशय साधी सोपी भाषा वापलेली आहे. वाचताना विचारांची देवाण घेवाण पटकन होते. समजण्यासाठी सुलभ भाषा आहे. आकलन पटकन होते. सूक्ष्म गोष्टीने लेखन केलेले आहे. त्यामुळे शंका निर्माण होत नाहीत. सर्व शंकांची सोडवणूक होते. लेखकाच्या लेखन कृतीबरोबरच लेखकाच्या व्यक्तिमत्वाच्या अभ्यास, लेखकाच्या मनोवृत्तीचा अभ्यास आणि त्या लेखकावर परिणाम करणाऱ्या निरनिराळ्या विचारसरणीचा लेखकाच्या ललित कृतीवर होणाऱ्या परिणामाचा उल्लेखही केलेला आहे. दोन पात्रांचा उल्लेख व प्रमुख पात्रांचा उल्लेख  वाङ;मयकृतीच्या लेखकाने जे साधण्याचा प्रयत्न केलेला आहे ते लेखकाला कितपत साधलेले आहे. याचे निरिक्षण वा. ल. कुलकर्णी करतात. वाङ;मयकृतीच्या आवृत्तीचा प्रथम समीक्षा लेखनापूर्वी उल्लेख केलेला आढळतो.

वा. ल. कुलकर्णी जेव्हा वाङ;मयकृतीचे वाचन करताना स्वत:च्या निर्मितीक्षम विचार सरणीला वाव देतात. खतपाणी घालतात. आपले विचार वा. ल. नी आत्मविश्वासाने खात्रीपूर्वक मते मांडलेली आहेत. हे त्यांच्या समीक्षा लेखनावरुन जाणवते. वाङ;मयकृतीचे लेखन करणाऱ्या लेखकाच्या मनाचे चित्रण

वा. ल. कुलकर्णींचे विचार त्यांच्या भूमिकेला धरून आहेत. समीक्षेची भूमिका विषद करताना ते ललित लेखक व वाड;मयीन टीकाकार यांचा परस्पर संबंध अनेक मुद्द्यांसह असून उलगडून दाखविलेला आहे. तोच संबंध आपल्या लेखनातून व्यक्त करतात.

वाड;मयकृतीचे लेखन करताना लेखकाच्या वयाचाही विचार केलेला दिसून येतो. समीक्षा लेखन करताना कालखंडाचाही उल्लेख केलेला आहे. ललित कलाकृतीची समीक्षा करीत असताना आपली मते पटवून देण्याची कुलकर्णींची पद्धत चांगली आहे. आणि ती मते वाचकांना पटवून देण्यात ते यशस्वी होतात. समीक्षेची मांडणी सुलभपणे करतात. विचारपूर्वक समीक्षा करतात. त्यांचा दृष्टिकोण हा व्यापक आहे. सर्व बाजूंचा विचार करुन मग आपले मत मांडतात. टिपणे काढून समीक्षा केलेली आहे. समीक्षा करण्यापूर्वी ते टिपणे काढतात.

लेखकाच्या स्वभावाचा, 'ललित वाड;मयावर ' पडणाऱ्या परिणामांचाही ते अभ्यास करतात. वा. ल. कुलकर्णी संवेदनाक्षम वृत्ती ठेवून लेखन करतात. अनेक गोष्टींचे भान ठेवून समीक्षा लेखन करतात. एखाद्या लेखकाच्या वाड;मयीन कृतीबद्दल सामान्य विवेचनातूनही गुण-दोष मांडण्याची समीक्षा करण्याची पद्धत वा. ल. नी अवलंबलीलेली आहे.

समीक्षा पुस्तकांची रचना, आखीव रेखीव बांधेसूद आहे. समीक्षा लेखनात कालखंडा उल्लेख केलेला आहे. यावरुन कालखंडाचा संपूर्ण अभ्यास करुन समीक्षा केलेली दिसते. दुजाभाव केलेला नाही. पूर्वग्रहदूषित दृष्टिने समीक्षा लेखन केलेले आहे. कोणताही पक्षपातीपणा केलेला दिसून येत नाही. उत्तम समीक्षकाचा गुण दिसून येतो. तयारीनिषी ते समीक्षा करायला बसतात. समीक्षा करत असताना वाड;मयकृतीचे योग्य मूल्यमापण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. समीक्षेचे मूल्यमापण योग्यरितीने करुन कलाकृतीला योग्य तो न्याय देतात. कोणत्याही लेखकांवर व वाड;मयीन कृतीवर अन्याय होऊ दिला नाही. जसे गुण मांडले आहेत तसेच दोषही मांडलेले आहेत. निर्भिडपणे आत्मविश्वासपूर्वक भाषेचे लिखान केलेले आहे. 'समीक्षा' लेखण करत असताना अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. काही ठिकाणी लेखकाच्या लेखण कौशल्याची मनापासून दाद देतात. आपल्या मनामध्ये आलेल्या शंका मनमोकळेपणाने मांडतात. काही ठिकाणी खेद व्यक्त केलेला आहे.

'नाटककार खाडिलकर एक अभ्यास' हे पुस्तक वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेचे पुस्तक आहे. या पुस्तकाची समीक्षणपर रचना अतिशय रेखीव आणि सुंदररितीने मांडलेली आहे. वा. ल. कुलकर्णी यांनी या पुस्तकाचे सोईस्कर भाग पाडलेले आहे. आणि लेखकाच्या  वाड;मयकृतीची समीक्षा मांडताना वा.ल.कुलकर्णींनी सर्व गोष्टींचा अतिशय सूक्ष्मपणे विचार करुन लेखनाची मांडणी करतात. समीक्षेपूर्वी वाड;मयकृतीबद्दल लेखकाचे काय मत आहे. ते मत प्रस्तावनेमध्ये काय आहे ते प्रत्येक वाड;मयकृतीचे समीक्षण करण्यापूर्वी मांडलेले दिसून आले. प्रत्येक पुस्तकाच्या सुरवातीला जी आवृत्ती लिहिली त्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत समीक्षेच्या लेखनाच्या उद्देशाचा उल्लेख केलेला आहे.

साहित्य विषयक, नाट्यविषयक भाषणे व लेख यांचाही आपल्या समीक्षेमध्ये उल्लेख केलेला आहे. एखाद्या लेखकाविषयी व लेखनाविषयी समीक्षा करावयाची असेल तर त्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचा, त्याच्या स्वभावाचा, विचारांचा, वैशिष्टये यांचा अभ्यास केल्याची जाणीव त्यांच्या समीक्षेवरुन येते. केवळ

वाड;मयकृतीचाच अभ्यास करून समीक्षा केली नाही तर लेखकांची भाषणे याची टिपणे कुलकर्णींनी तयार करुन समीक्षा केली. समीक्षा विषयाची वा. ल. ना अत्यंत आवड असलेली दिसून येते. वाड;मय कृतीमध्ये खटकणाऱ्या गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. कोणावरही अन्याय होवू नये ही मनापासूनची इच्छा दिसून येते. आपल्या चुकांची नम्रपणे कबुली देतात. आणि वा. ल. कुलकर्णी यांचा समीक्षेला शोभणारा गुण म्हणजे 'नम्रपणा' अंगी होता.

समीक्षेचे लेखन कोणत्या तारखेला, कोणते लेखन केले याची नोंद आहे. यावरुन त्यांचा वक्तशीरपणा व शिस्तबद्धता दिसून येते. वाड;मय कृतीतील 'दोष' दर्शन करता करता ते स्वत:च्या चुकांचीही कबुली देतात. समीक्षेचे लेखन अतिशय आस्थेने व जिव्हाळ्याने केलेल आहे. कालखंडाची समीक्षा वाड;मय कृतीबरोबर केली. समीक्षा वाचकांना जास्तीत जास्त सुलभरित्या आकलन व्हावे यासाठी वा. ल. कुलकर्णी यांनी अनेक उदाहरणे देऊन समीक्षा मांडण्याचा प्रयत्न केला. अतिशय मार्मिक उदाहरणांनी 'समीक्षा' मांडली.

वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेवरुन असे दिसून येते की त्यांनी वाचन हे अतिशय विपूल प्रमाणात केले. समीक्षेचा अभ्यास केल्यानंतर वाचनाची व्याप्ती लक्षात येते. बाल वाड;मयावरही समीक्षा केली. त्यांच्या शंकाच्या समाधानासाठी देखिल त्यांनी समीक्षा केली. वाड;मयीन समीक्षा म्हणजे, 'वाड;मयीन सत्यांचा शोध' असे वा. ल. कुलकर्णी मानत आले.

स्वत:ची समीक्षा मांडता मांडता, समीक्षा या क्षेत्राचाही विचार वा. ल. नी केलेला आहे. 'टीका आणि टीकाकार' यांच्या विषयी आपली मते मांडलेली आहेत.

गेल्या दोन तपातील वाड;मय विचार या आपल्या वाड;मयीन मते आणि मतभेद या पुस्तकातून मांडण्याचा प्रयत्न केला. समीक्षा करण्यापूर्वी ललित वाड;मयाची प्रकृती समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांची समीक्षा केवळ वाड;मय कृतीचे वाचन करुन केलेली नाही. पण जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा त्यांनी अनेक भाषणे ऐकली. साहित्य चर्चेत सहभागी होऊन अनेक टिपणे काढली. एखाद्या वाड;मयीन कृतीची लेखकाची समीक्षा करण्यापूर्वी अतिशय सूक्ष्म दृष्टिने कलाकृतीचे वाचन पुन: पुन्हा केले. पूर्ण स्वत:ला वाड;मयकृतीचे आकलन झाल्यानंतर पूर्ण आत्मविश्वापूर्वक समीक्षेला त्यांनी हात घातला. अनेक कच्ची टिपणे काढली. वाड;मयकृती एकदा वाचून लक्षात आली नाही तर ती कळेपर्यंत वाचली. आणि आपली समीक्षा केली.

वाड;मयीन मतांविषयी मतभेद कशाप्रकारे घडून आले. त्या मतांविषयीची दखल आपल्या समीक्षेतून वा. ल. कुलकर्णी यांनी घेतली. समीक्षेवर समीक्षा केली. एक ठराविक कालखंड घेऊन त्या कालखंडामधील वाड;मयविषयक कोणकोणाची काय मते आहेत त्या मतांवरील वा. ल. कुलकर्णी यांची समीक्षा 'वाड;मयीन मते आणि मतभेद' या पुस्ताकातून केलेली दिसून येते. आपल्या समीक्षेतून वाड;मय जास्तीतजास्त निर्दोष करण्याचा प्रयत्न केला.

वाड;मयातील उणिवा दाखवून त्यावर उपाय योजना व्हावी यासाठी उपाय योजना केली जाऊ लागली. हे साहित्यिक निरनिराळे उपायही सुचवित होते. तीस, एकतीस सालानंतर विचारांची दिशा बदलल्याचे प्रयत्न होऊ लागले. या कालखंडात बालवाड;मयात झालेली वाढ हे या कालखंडाचे वैशिष्ट्य

आणि ललित लेखक स्थूलाकडून सूक्ष्माकडे अधिकाधिक जाऊ लागले.

वा. ल. कुलकर्णी वाङ;मयीन समीक्षा आणि त्यांचे नाते अतूट आहे. असे जाणवते. कालखंडातील साहित्याच्या चढऊतारांची दखल साहित्याने घेतली. वा. ल. कुलकर्णी यांची समीक्षा वाचल्यानंतर ती समीक्षा वाचकांना व लेखकांनाही उपयोगी पडणारी आहे. वाचकांची समज वाढवून देणारी आणि वाङ;मयीन ज्ञानांमध्ये भर टाकणारी समीक्षा वाटते.

आदर्श समीक्षकाचे सर्व गुणविशेष हे कुलकर्णींच्या समीक्षेचा अभ्यास केल्यानंतर दिसून येतात. त्यांची संशोधक व सखोल दृष्टी जाणवते. निष्पक्षपातीपणा, सत्याला धरुन त्यांनी समीक्षा केलेली आहे. कालखंडाच्या घडामोडीचा, समाजातील बदलांचा अभ्यास बारकाईने केलेला दिसून येतो. 'वाङ;मयीन मते आणि मतभेद' हे पुस्तक जेव्हा मी वा. ल. चे वाचले तेव्हा समीक्षा करत असताना कालखंडाचे भान त्यांनी ठेवलेले दिसून येते. ह्या पुस्तकातील पहिलाच लेख म्हणजे गेल्या दोन तपातील काही वाङ;मयीन विचार वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेतून असे जाणवते की, साहित्याविषयी त्यांना जिव्हाळा आहे काही वाङ;मयीन समस्या वाचकांच्या रसास्वादाला अडथळा कशा बनतात आणि या समस्या नाहीशा करुन वाचकाने वाङ;मयाचा आस्वाद योग्य रितीने घेतला पाहिजे अशी मनापासूनची तळमळ कुलकर्णी यांची दिसून येते. उदा.- वा. ल. कुलकर्णी आपल्या वाङ;मयीन मते आणि मतभेद या पुस्तकातून शीर्षकाविषयी प्रश्न व नवलेखनाचे स्वरुप या लेखांमध्ये ते म्हणतात की रुपकात्मक शीर्षक देणारे लेखक हे मोठे कल्पक असतात त्यांच्या ठिकाणी सबंध कल्पनासूचक असतात.

आपल्या समीक्षेमधून वाङ;मयीन विकास साधण्याचा प्रयत्न वा. ल. कुलकर्णी करतात कारण बालवाङ;मयाचाही विकास होऊन बालमनामध्ये वाङ;मय रुजले तर वाङ;मयाची प्रगती होते असे ते म्हणतात.

समीक्षा करत असताना वा. ल. कुलकर्णी मानसशास्त्राचाही आधार घेतात हे खालील उदाहरणावरुन दिसून येते. बालवाङ;मयासंबंधी लिहिताना ते म्हणतात की, लहानपणी मुलांची असलेली आवड आणि तीच मुले मोठी झाल्यानंतरची आवड यामध्ये फरक दिसून येतो. कारण बालकाची लहानपणीची अभिरुची आणि तेच बालक मोठे होते. तेव्हा बदललेली त्यांची रुची याचाही अतिशय सूक्ष्मपणे कुलकर्णी यांनी विचार केलेला दिसून येतो. आणि तो विचार बालमनाशी व प्रौढमनाशी संबंधित आहे. म्हणूनच कुलकर्णी हे आपली समीक्षा लेखन करत असताना त्यांना मानसशास्त्राचाही अभ्यास करावा लागला हे यांवरुन सिद्ध करता येते. बालवाङ;मयामध्ये विचार करुन योग्य त्या ठिकाणी योग्य ती चित्रे घालायला हवीत असे सांगतात म्हणजे यांवरुन वाङ;मय हे निर्दोष असावे. अशी त्यांची प्रबळ इच्छा दिसून येते. समीक्षेतून वाङ;मयाला निर्दोष बनविण्याचे काम वा. लं.नी केले. समीक्षेमधून वाङ;मयाच्या वाचकाला कशाप्रकारे उपयोग होतो. किंवा तो त्यांना कसा करुन घेतला पाहिजे हे कुलकर्णी आपल्या लेखनांतून सांगतात.

वाङ;मयातून निर्माण होणारे संस्कार आणि ते संस्कार वाचकांच्या मनावर परिणाम करणारे असतात. याचाही विचार वा. ल. कुलकर्णी करतात. वाङ;मयाचे बालकांच्यावर उत्तम संस्कार होण्यासाठी उत्तम वाङ;मय ठेवणे आवश्यक आहे. वा. ल. कुलकर्णी यांनी ज्याप्रमाणे आपल्या समीक्षेमधून महान गुण-दोष दर्शन केले. तसेच महान ताकदीने केवळ गुणच दाखवून दिले. तसेच दोष दर्शनही केले. उदा.- वाङ;मयीन

मते आणि मतभेद या पुस्तकातून महान गुण व महान दोष या लेखातून दिसून येतो. या लेखांमध्ये कुलकर्णीनी समीक्षा कशी केली पाहिजे. वाड;मयाविषयीच्या विचारांचे स्वरुप सामान्यत: असे असायला हवे त्यामध्ये कृतज्ञताबुद्धी तर हवीच हवी परंतु त्याचबरोबर अचूक मूल्यमापनाची तीव्र इच्छाही हवी दृष्टी निवळून समीक्षेकडे पाहिले पाहिजे. असे वा. ल. कुलकर्णी सांगतात. स्वत:ही कुलकर्णी वाड;मयीन समीक्षा करताना आदराने समीक्षा करतात.

समीक्षेमधून आत्तापर्यंत ज्या ज्या लेखकांना वाड;मयात मानाचे स्थान देण्याची योग्यता असूनही ते त्यांना दिले जात नाही. अशा प्रकारची खंत व्यक्त केलेली आहे. आणि आपल्या समीक्षेमधून वारंवार त्यांचा उल्लेखही करुन दाखविलेला आहे. समीक्षा लेखन करताना वा. ल. कुलकर्णी यांनी वाड;मयकृतीच्या लेखकाच्या प्रतिभेची ठेवण कोणत्या प्रकारची होती हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात आणि मगच वाड;मयाचा विचार करतात. लिखाणाची वैशिष्ट्ये समीक्षेतून मांडली.

समीक्षा करीत असताना अनेक ठिकाणी उपमा दिलेल्या आहेत. उदा.- गडकऱ्यांच्या वाड;मयाला बहुरंगी ठिगळाची आकर्षक बनलेली गोधडी अशी उपमा दिलेली आहे. वा. ल. कुलकर्णी समीक्षा सलगपणे करीत नाहीत. समीक्षेमधील त्यांच्या भाषेचा विचार केला तर अतिशय साधी सोपी भाषा वापरलेली आहे. समीक्षेमधील विचार मांडताना ते विचार सर्वसामान्यांना समजतील अशा पद्धतीने मांडलेले आहेत. प्रत्येक वेळी प्रास्ताविकांमध्ये समीक्षेचा हेतू विशद केलेला आहे. सर्व वाड;मयप्रकारची समीक्षा केलेली दिसून येते. वा. ल. कुलकर्णी यांना सर्वच वाड;मयप्रकारांच्या वाचनाची आवड आहे. असे दिसून येते. केवळ वाड;मयप्रकारांचाच नव्हे तर वाड;मयीन लेखकाच्या मनाचा शोध घेऊन त्यांनी समीक्षा केलेली दिसून येते. प्रत्येक वेळी ज्या विषयावर समीक्षा करायची त्याविषयाचे नाव वर लिहून समीक्षेची मांडणी अतिशय सुलभपणे केलेली आहे. यांवरुन त्यांची मांडणी कौशल्य लक्षात येते. त्यांची समीक्षा वाचल्यानंतर ते एक अभ्यासू वाचक आहेत. असे दिसून येते. वाड;मयाकडे पाहण्याचा बहुतांशी लोकांचा चुकीचा दृष्टीकोन बदलविण्यास ते वाचकांना सांगतात समीक्षा करता करता समीक्षेविषयी स्वत:ची भूमिकाही ते पटवून देतात. आणि काही वाड;मयअभ्यासकांनी जी मते मांडलेली आहेत ती कशी चुकीची आहेत ते सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. वेळोवेळी उदाहरणे देऊनही आपली समीक्षा स्पष्ट केलेली आहे. समीक्षा करीत असताना त्यांचा नम्रपणाही दिसून येतो. समीक्षकाने कसे असले पाहिजे हेही सांगतात त्यांच्या समीक्षेतून त्यांचा शिस्तबद्धपणा आणि काटेकोरपणा दिसून येतो. वा. ल. कुलकर्णी यांनी प्रथम पुस्तकांचे वाचन केले. आणि वाचन केल्यानंतर त्यांच्या मनामध्ये समीक्षेतून हळूहळू वाढ झाली आणि वाचकांतून एक समीक्षक निर्माण झाला. आणि मराठी वाड;मयसृष्टीमध्ये एक समीक्षक म्हणून त्यांनी आपली छाप कायम ठेवली. त्यांच्या समीक्षेमधून त्यांचे वाड;मयावरील प्रेम तर दिसून येतेच पण त्याचबरोबर त्यांची समीक्षणपर पुस्तके म्हणजे त्यांचे सर्वात प्रसिद्ध झालेले पुस्तक म्हणजे साहित्य स्वरुप आणि समीक्षा टीपा आणि टिप्पणी, साहित्य शोध आणि बोध, नाटककार खाडिलकर एक अभ्यास, मराठी ज्ञान प्रसारक इतिहास वाड;मयाविचार हरिभाऊंची कादंबरी न. चि. केळकर वाड;मयदर्शन, श्रीपादकृष्ण : वाड;मय दर्शन, वाड;मयीन दृष्टी आणि दृष्टिकोण, वाड;मयीन मते आणि मतभेद, वामन मल्हार वाड;मयदर्शन, हरिभाऊंच्या कादंबरीतील व्यक्ती, काव्यातील दुर्बोधता इत्यादी समीक्षेविषयीची पुस्तके वाचल्यानंतर त्यांच्या

समीक्षेचे विशेष लक्षात आले.

आपल्या समीक्षणांमधील अपरिपक्व विचारांची कबुली वा. ल. कुलकर्णी स्वत: देतात वाचकांना समीक्षेचे वाचन करताना एक खबरदारी घ्यायला सांगतात. म्हणजे समीक्षेचा अभ्यास त्या कालखंडातील निर्माण होणाऱ्या वाड;मयाशी असतो. समीक्षेचे वाचन करीत असताना ती समीक्षा कोणत्या कालखंडातील आहे याचाही विचार करणे अतिशय आवश्यक आहे. आपल्या आत्मप्रत्ययाला जागे ठेऊन कुलकर्णींना समीक्षा चालू ठेवली असता मोठा आनंद मिळतो असे सांगून ते स्वत:ही आपल्या आत्मप्रत्ययाला जागे ठेऊनच समीक्षा करतात. समीक्षा करताना वा. ल. कुलकर्णी वाड;मयाच्या अन्तर्बाह्य स्वरुपासंबंधी विचार करतात.

आपल्या समीक्षेमधून वा. ल. कुलकर्णी वाड;मय सेवकांना सांगतात की, सत्याची, सुसंगतीची, शिवाची व सौंदर्याची जोपासना, उपासना, करीत राहण्याचे काम केले पाहिजे. त्यातच त्याचे समाधान व हित आहे. यातूनच वाड;मयाची जपणूक केली पाहिजे. वाड;मयविषयीचा जिव्हाळा दिसून येतो.

जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा वा. ल. भाषण करताना देखील वा. ल. कुलकर्णी आपल्या वाड;मयातून मनोविश्लेषण केलेले आहे. म्हणजे समीक्षा करताना कादंबरीतील पात्रांचे मनोविश्लेषण करुन समीक्षेला हात घातला आहे.

कादंबरीची समीक्षा करण्यापूर्वी वा. ल. कच्ची टिपणे तयार करत आणि मग पक्की खात्रीपूर्वक समीक्षा करताना त्या टिपणांचा ते सविस्तरपणे विचार करीत असत. समीक्षा करीत असताना वा. ल. कुलकर्णी स्वत:च्या शंका स्वत: सोडविण्याचा प्रयत्न करतात. आपल्या वाड;मयाबद्दल वाटणाऱ्या समस्या, शंका मांडून त्याबद्दल सविस्तर विचार करतात. वाड;मयकृती विषयीचे विचार मांडत असतात. वा. ल. कुलकर्णी स्वत: ही विचार मांडताना अनेक मतांचा परिणाम वा. लं.वर झालेला असतो. वा. ल. कुलकर्णी यांनी राजकीय कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, चरित्रलेखन नाटक, कथा, मनोविश्लेषणात्मक कादंबरी, एकांकिका वाड;मयकृतीच्या लेखकांच्या मनाचा अभ्यास आत्मचरित्रांचा अभ्यास इत्यादी निरनिराळ्या वाड;मयप्रकारावर वा. ल. कुलकर्णी यांनी समीक्षा केलेली आहे. वा. ल. कुलकर्णी यांनी सर्व प्रकारांचे वाचन केलेल आहे. साहित्यविषयक आवर्जुन भाषणे एकलेली आहेत.

वाड;मयकृतीवर केवळ समीक्षाच केली नाही तर त्याच्या वाड;मयकृतीचे लेखनाचे, वाड;मयाचे महत्व तळागाळतल्या वाचकांना पटवून देणे आणि वाड;मयाचे मूल्य वाढविण्याचे काम आपल्या समीक्षेतून केलेले आहे. वाड;मयाची प्रगती व्हावी अशा प्रकारची तीव्र इच्छा वा. ल. ची दिसून येते.

'मराठी नाटक व मराठी रंगभूमी' या विषयी समीक्षा करताना वा. ल. कुलकर्णी पाश्चात्य साहित्याचा अभ्यास करतात असे दिसून येते. पाश्चात्य साहित्याचा मराठी साहित्यावर झालेला परिणाम ते सिद्‌ध करुन दाखवतात म्हणजे यावरुन असे सिद्‌ध होते की, वा. ल. कुलकर्णी यांनी पाश्चात्य साहित्याचादेखील अभ्यास केलेला आहे. आपली समीक्षा वा. ल. कुलकर्णी अतिशय गंभीरपणे करतात, दक्षतेने करतात. वारंवार वाड;मयाची जपणूक केली पाहिजे. अशा प्रकारची इच्छा ते समीक्षेतून व्यक्त करताना दिसतात. वाड;मयाच्या विकासासाठी कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत हे ही कुलकर्णी वारंवार आपल्या समीक्षेतून सांगतात याची जाणीव होते. समीक्षेमध्ये काही लेखन  हे स्वत:च्या शंकाच्या समाधानार्थ केलेले आहे.

काही समीक्षेमध्ये लेखन हे अनौपचारिक पध्दतीने केलेले दिसून येते. स्वत:च्या समीक्षेचा विचार करताना इतरांच्या ही समीक्षेचा विचार केलेला आहे. कुलकर्णी यांनी समीक्षेवर ही समीक्षा केलेली आहे.

वा. ल. कुलकर्णी यांची समीक्षा वाड;मयाच्या विकासाला मदत करणारी आहे. समीक्षेवर ही समीक्षा करतात. परीक्षणकारांच्या दृष्टीत इतकी ठराविकता आणि निश्चितता आढळत नाही. आजच्या समीक्षेमध्ये छाती ठोकपणे व निसंदग्धपणा आढळनेसा झालेला आहे. आपल्या समीक्षेमधून वाड;मयीन समस्या सोडविण्याचा प्रयत्न वा. ल.कुलकर्णी यांनी सामान्य वाचकाविषयी ही आपली मते मांडलेली आहेत. अगदी बालपणापासून कुलकर्णी यांना वाचनाची आवड होती. कुलकर्णी यांच्या समीक्षेला सुरुवात झाली ती त्यांच्या प्रौढवयापासूनच कुलकर्णी यांनी समीक्षणात्मक विचार बालपणी केलेले असतील परंतु त्यांच्या समीक्षेला तेव्हा परिपक्वता आलेली नव्हती. आपल्या समीक्षेदूवारा तरुणांमध्ये वाड;मयाभिरुची निर्माण करण्याचे प्रयत्न करतात.

वामन मल्हार वाड;मयदर्शन हा प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचा अगदी सुरुवातीचा ग्रंथ वामन मल्हार जोशी स्मारक व्याख्यानमाला सुरु झाली ती त्यांच्या व्याख्यांनानी त्या व्याख्यानांतून निर्माण झालेल्या या ग्रंथाची तिसरी आवृत्ती प्रसिध्द होत आहे. यावरुन अभ्यासकांना त्यांच्या चिकित्सक समीक्षणाबद्दल केवढा विश्वास वाटतो याची कल्पना येते.

वाड;मयावर विशुध्द प्रेम व वाड;मयाचा निरंतर व्यासंग हे त्याचे विशेष गुण म्हणून सांगता येतील ते लेखनप्रवृत्त होतात. ते शोधकांच्या विन्रम परंतु वस्तुनिष्ठ भूमिकेने अनेक वर्षांच्या वाड;मयभ्यासाने त्यांची भूमिका किती शुध्द (पाया) बनलेली आहे हे सर्वांच्याच लक्षात आलेले आहे. वाड;मयकलेविषयी एकनिष्ठ व आस्थेवाईक चोखदंळ अशा जिज्ञासू वृत्तीतूनच प्राधान्याने त्यांचे टीकालेखन जन्म घेते. लेखन किंवा भाषण करण्यापूर्वी त्या विषयाचा जे साक्षेपाने अभ्यास करतात अशा लेखकापैकी व वक्त्यापैकी ते एक आहेत. वाड;मयीन लेखकाने केलेले कार्य त्याचा उल्लेख करुन त्या लेखकाच्या योगदानाचा उल्लेख वा. ल. कुलकर्णी आपल्या समीक्षेतून करतात. आणि त्यांच्या कौशल्यांची दाद देतात.

समीक्षेमधून भाषाशैलीचा अभ्यास करुन भाषा शैलीची वैशिष्ट्ये नमूद केली. आपली समीक्षा करीत असताना कोणकोणते साहित्य हाताळले त्याचाही उल्लेख वा. ल. कुलकर्णी वेळोवेळी करतात.

'वा. ल. कुलकर्णी' या समीक्षकाची निर्मिती झाली ती प्रथम एका व्यासंगी आणि अभ्यासू वाचकांतून चोखदंळपणा, सूक्ष्मदृष्टी, पुरेपुर विचार करण्याची क्षमता वा. ल. कडे होती. अशा वाचकांच्या मनातून निर्माण होणाऱ्या समीक्षकाला वरील सर्व त्यांच्यातील गुणांनी खतपाणी घातले. त्यामुळे समीक्षकाची निर्मिती झाली. म्हणूनच वाड;मय जगतात ते एक प्रसिध्द व नामवंत 'समीक्षक' म्हणून ओळखले जातात.

वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेला सुरुवात झाली त्यांच्या व्याख्यांनापासून जेव्हा जेव्हा वा. ल. नां व्याख्यानांसाठी आमंत्रण दिले जात होते. तेव्हा तेव्हा ते जाताना अनेक पुस्तके हाताळत आणि यातूनच त्यांना समीक्षेची आवड निर्माण झाली. ते पेशाने प्राध्यापक असल्यामुळे सतत पुस्तकांच्याच सान्निध्यामध्ये ते राहिले. त्यामुळे त्या वातावरणांमध्ये वावरताना वाचनाविषयीची एक ओढ त्यांना निर्माण झाली, आवड निर्माण झाली. लहानपणापासूनच होती परंतु वृध्दीगंत होत गेली आणि तिचा विकास होत गेला आणि व्यवसायाने प्राध्यापक असल्यामुळे त्याच वातावरणामध्ये शेवटपर्यंत ते राहिले.

अनौपचारिक व औपचारिक या दोन्हींही भाषेतून वा. ल. कुलकर्णी यांनी समीक्षा लेखन केलेले आहे. अनेक पुस्तकांवर वा. ल. नी चिंतन, मनन केले. गांभीर्याने विचार करुन अभ्यास करावा लागत असे. वाड;मयाचे वाचन करीत असताना अनेक प्रश्न वा. ल. ना सतत भेडसावत राहिले. आणि या प्रश्नांची उत्तरे शोधून काढल्याशिवाय यांचे समाधान होत नसते. म्हणून ते उत्तरे शोधण्यासाठी वाचनाची व्यापकता वाढवित असत. प्रश्नांचा उलगडा करताना वा. ल. कुलकर्णी वाचन करतात.

समीक्षेतून आपले विचार व्यक्त केले. त्याचबरोबर कालखंडात बदल झाला की, साहित्यातही बदल होतो हे ही दाखवून दिले. साहित्यातून मूल्यविचार समजले पाहिजेत. साहित्य हे समाज सुधारणा करण्याचे साधन आहे हे ही त्यांनी समीक्षेमधून दाखवून दिले.

समीक्षणात्मक लेखनातून वा. ल. नी साहित्यातील दोष दाखवून साहित्य जास्तीत जास्त शुध्द व्हावे म्हणून दूषित झालेले साहित्य आपल्या समीक्षेतून ते कसे जास्तीत जास्त शुध्द करता येईल याचाच सतत प्रयत्न केला. हे मराठी साहित्याला त्याचे फार मोठे मोलाचे योगदान असे म्हणता येईल. वा. ल. कुलकर्णी भानव जाणीव ठेवूनच समीक्षा करतात. लेखकाच्या वाड;मयाचे गूढ उकलण्याचे काम आपल्या समीक्षेतून केलेले दिसून येते. लेखकाच्या वाड;मयाचे गूढ उकलणे तसे कठीण काम असते परंतु हे काम करताना मौज वाटते. वाड;मयातील गूढ आपण संपूर्णपणे उकलू अशी कोणतीही प्रतिज्ञा नसते. आपले टीकालेखन म्हणजे केवळ ह्या दृष्टीने आपण आस्थापूर्वक केलेला एक प्रयत्न असतो. त्यात काही हाती लागते. हे स्वतः न्याहाळण्यात व दुसऱ्याला दाखविण्यात एक प्रकारचा आनंद वाटतो आणि तो वेळावेळी मी चाखला.

वाड;मयाच्या परिशीलनानंतर निष्कर्ष काढले आणि हे निष्कर्ष त्यांनी लेखकाच्या आत्मनिवेदनाशी पडताळून पाहिले. आणि ते पडताळून पाहणे नेहमी उद्‌बोधक ठरले. समीक्षा लेखन साधार केलेले दिसून येते. कुलकर्णी जेव्हा अनेक अध्यक्षीय भाषणे करीत तेव्हा अनेक जण त्यांच्यावर आक्षेप घेत. तेव्हा अशा प्रकारच्या टीकेला मोठ्या आत्मविश्वासाने वा. ल. सामोरे जातात आणि नम्रपणे उत्तरे देतात. आपले विचार टीकाकाराला पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करतात.

वाड;मयीन कृतीचा वाचकांवर होणाऱ्या परिणामाचाही अभ्यास वा. ल. नी केला. त्यांनी शीर्षक देऊन समीक्षा केलेली असल्यामुळे समीक्षेचे वाचन करताना समीक्षेचे वाचन आकलनास कठीण असूनदेखील अवघड गुंतागुंतीचे वाटत नाही. कारण मांडणी अतिशय सुलभरित्या केलेली दिसून येते. समीक्षात्मक पुस्तकाचे स्वरुप अतिशय आखीव रेखीव केलेले दिसून येते. शिर्षके, संदर्भ, सूचि, परिशिष्ट्ये यांची मांडणी अतिशय उत्तमपणे केलेली आहे.

समीक्षा करीत असताना केवळ वाड;मयकृतीतील कथानकाचाच विचार न करता त्या लेखकाची बौद्धिकक्षमत, सभोवतालची परिस्थिती त्याचा लेखकावर व त्याच्या वाड;मयकृतीवर झालेला परिणाम लेखकावर कोणत्या विचारसरणीचा परिणाम झाला याचा ही विचार केला.

जगातील सर्वच श्रेष्ठ लेखकांविषयी असेच विधान करावे लागते. कारण त्यांच्या लिखाणातील अगदी कानाकोपऱ्यात ही त्यांनी आपले जीवन सर्वस्व ओतलेले असल्यामुळे त्यांचा पूर्णपणे आस्वाद घ्यावयाला त्यांचे वारंवार परिशीलन करावे लागते व हे परिशीलन अनेकवार करुन ही त्यांचा आस्वाद

पूर्णत्वाने घेता येतोच असेही नाही.

समीक्षेविषयी विचार मांडता मांडता लेखकाचे व्यक्तिमत्व उभारण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत होते. ज्या वाङ;मयकृतीविषयी इतर टीकाकारांची मते काय आहेत ते ही वा. ल. जाणून घेत असत व त्यांच्या मतावर विचार करत. वाङ;मयनिर्मितीवेळी सामाजिक स्थितीचाही विचार वा. ल. ना करावा लागत असे. ज्या वाङ;मयकृतीची वा. ल. समीक्षा करत त्या वाङ;मयकृतीच्या वाचकांकडेही त्यांचे लक्ष जात असे. कादंबरीच्या समीक्षेमधून लेखकाच्या व्यक्तीमत्वाच्या वैशिष्ट्यांचा शोध घेतलेला आहे.

वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेचे जाणवणारे आणखी एक वेगळेपण म्हणजे त्यांनी निरनिराळ्या दिलेल्या उपमा. इंदू काळे व सरला भोळे या कादंबरीतील तत्वचर्चानांही उपमा दयावीशी वाटते. ह्या तत्वचर्चा म्हणजे त्यांच्या कादंबरी लेखनाचे एक मोहनच आहे. तापलेल्या सायीसारख्या त्या काही ठिकाणी भासतात. तर 'इंदू काळे सरला भोळे' या कादंबरीत पागांरकरांची 'उपमा' घेऊन बोलावयाचे म्हणजे दूधात साय जीरवावी त्याप्रमाणे वामनरावांनी कथाप्रवाहात आपले तत्वशोधन जीरवून त्या दोन्ही गोष्टी एकरुप केलेल्या आहेत असाच सुखद प्रत्यय येतो.

'समीक्षा' करीत असताना ठिकठिकाणी शंका व प्रश्न उपस्थित केलेले आहेत. समीक्षा करत असताना वारंवार समाधान व्यक्त केलेले आहे. लेखकाच्या लेखन कौशल्याचीही दाद देतात. आपली वाङ;मय समीक्षा वाङ;मयभ्यासकांना, वाचकांना, वाङ;मयजिज्ञासूना, वाङ;मयउपासकांना उपयोगी पडून वाङ;मयाचा विकास होण्यासाठी उपयोगी ठरावी. अशा प्रकारचा मनांमध्ये हेतू ठरवून त्यांनी समीक्षा केली. वाङ;मयकृतीच्या लेखकाची अभ्यासाची खोली आपल्या समीक्षेच्या मापनाने मोजण्याचे काम वा. ल. नी केले. लेखकाच्या कौशल्यांना दाद दिली. शीर्षके देऊन समीक्षा केली.

समीक्षेमध्ये अपूर्णताही असतेच असे वा. ल. चे स्वत:चे मत आहे ते म्हणतात की मराठी तत्वयोगी कलावंताच्या व्यक्तीमत्वाचे जेवढे चिंतन करावे तेवढे थोडेच आहे. तेव्हा झाले तेवढे अपुरे झाले याची जाणीव असून ही येथे नाईलजाने पूर्ण विराम असे म्हणतात. ठिकठिकाणी शंका व प्रश्न उपस्थित केलेले आहेत. समीक्षा करीत असताना समाधान व्यक्त केलेले आहे. लेखकाच्या लेखन कौशल्याचीही दाद देतात. वाङ;मयकृतीच्या लेखकाची अभ्यासाची खोली आपल्या समीक्षेच्या मापनाने मोजलेली आहे. शीर्षके देऊन समीक्षा केली आहे. समीक्षेमध्ये अपूर्णताही जाणवते असे वा. ल. चे मत आहे. ते समीक्षा करताना म्हणतात मराठी तत्वयोगी कलावंताच्या व्यक्तीमत्वाचे जेवढे चिंतन करावे तेवढे थोडेच आहे तेव्हा झाले तेवढे अपुरे झाले याची जाणीव असून ही येथे नाईलाजाने पूर्णविराम देतो असे म्हणतात. एखादी वाङ;मयकृती वाचून जर वाचकांच्या मनात शंका निर्माण होत असतील तर त्या का होतात त्या शंकाचे निरसन करण्याचा प्रयत्न वा. ल. करतात. वाङ;मयकृतीचा जास्तीत जास्त बोध वाचकाला करुन देण्याची धडपड समीक्षेमध्ये जाणवते. समीक्षा करण्यासाठी त्याच त्या वाङ;मयकृती पूर्ण समज येईपर्यंत वाचल्या. वाङ;मयकृती वाचताना मनाचे समाधान होते. वाङ;मयीन कृतीचे पूर्णपणे ज्ञान झाल्याशिवाय ढोबळमानाने वा. ल. मते मांडत नाहीत. चोखंदळपणे मत मांडतात. वाङ;मयकृतीत खटकणाऱ्या गोष्टी निसंकोचपणे मांडलेल्या आहेत.

वा. ल. कुलकर्णी समीक्षा करताना आपल्या साहित्याचे स्वरुप मांडून प्रयोजन, प्रकृतीविषयी आपली भूमिका मांडलेली आहे. साहित्यातील काही गोष्टीविषयी स्वत: वा. ल. ना काय वाटते ते आपल्या

भूमिकेत मांडतात.

वा. ल. कुलकर्णी समीक्षा लेखन हे अभ्यासाने व परिश्रमाने केलेले दिसून येते. समीक्षा `लेखन अभ्यासपूर्वकच केले पाहिजे असे त्यांचे स्वत:चे मत आहे. माहितीचे कण-कण गोळा करुन समीक्षा केलेली आहे. वाड;मयविचाराच्या शोधार्थ समीक्षा केलेली दिसून येते.

तक्ते, रखाने, क्रमबध्दता, टापटीपपणा, मांडणीची सुयोग्य पध्दती, शंकाचे निरसन, सूक्ष्म दृष्टीने आवश्यक त्या बारीक सारीक गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. समीक्षा लेखन करण्यासाठी मेहनीतीची आवश्यकता आहे. समीक्षा करीत असताना ती समीक्षा करण्यासाठी लेखकाला मेहनत घ्यावी लागली की नाही किंवा समीक्षकांच्या मेहनतीची दाद देताना वा. ल. म्हणतात, परिक्षणलेख लिहिण्यासाठी लेखकाने घेतलेली ही मेहनत पानांपानांवर दिसून येते. ग्रंथलेखकाला परिक्षणांसाठी विवेचकशक्तीची आवश्यकता असावी लागते. 'समीक्षा' लेखक ही एक आपल्या जबाबदारीची गोष्ट आहे आणि ती योग्य त्या दक्षतेने पार पाडणे हे समीक्षकाचे कर्तव्य आहे. यावरुन वा. लं. समीक्षकांना कर्तव्याची जाणीव करुन देतात.

समीक्षा करीत असताना ठिकठिकाणी आश्चर्य व्यक्त केलेले आहे. उदा:- खाडिलकरांच्या नाटकाबद्दल समीक्षा करताना वा. ल. कुलकर्णी म्हणतात नाटकाच्या घटनेसंबंधी त्याच्या जीवंत एकसंधत्वाविषयी गंभीरपणे विचार करण्याकडे त्यांच्याही मनाचा कल अनेकदा दिसत नाही याचे आश्चर्य वाटते. वाड;मयकृतीच्या लेखकाच्या बुध्दीचे मूल्यमापन केलेले आहे. प्रतिभेचे स्वरुप प्रकट करण्याचे सामर्थ्य वा. लं. च्यांत होते. समीक्षा लेखन करत असताना वाड;मयकृतीतील कथानक, संवाद, व्यक्तीचित्रण या सर्वांचा बारकाईने अभ्यास करुन आपले विचार मांडले. वाड;मयकृतीतील सामर्थ्य समजावून घेतले. भाषेचे स्वरुप वाड;मयकृतीची वैशिष्ट्येही नमूद केलेली आहेत. समीक्षा करीत असताना वाड;मयीन लेखकाने दोषरहीत वाड;मयकृतींची निर्मिती करावी. वा. ल. कुलकर्णी यांना वाड;मयकृती वाचत असताना काही चुका आढळल्या तर स्पष्टपणे त्या चुकांचा उल्लेख वा. ल. करीत. त्याचबरोबर लेखकाने वाड;मय लिखाण करीत असताना कोणकोणत्या दक्षता बाळगल्या पाहिजेत हे ही सांगतात म्हणजे वाड;मय लेखकाने वाड;मयामध्ये चुका करु नये व योग्य ती खबरदारी घेऊन लेखन करावे. असे वा. ल. सांगतात. वाड;मयविषयी आपली प्रतिक्रिया मांडतात. उदा:- बालवाड;मयसंबंधी लिहिलेली चित्रे ही सचित्र असतात आणि ती असायला हवीत. ही चित्रे चित्रकलेच्या दृष्टीने निर्दोष असली पाहिजेत व ही दक्षता प्रकाशकांनी बाळगली पाहिजे. बालवाड;मयसंबंधी परिस्थिती निराशाजनक आहे असे सांगतात.

समीक्षा लेखन करताना त्यांनी टिप्पणी तयार करुन अतिशय सुंदर मांडणी केली आहे. टिप्पणीमध्ये नाटक, लेखनकाल, पदांची संख्या, पहिला प्रयोग अशा प्रकारचे रखाने तयार करुन मांडणी करुन समीक्षा लेखनाला सुढौलपणा प्राप्त करुन दिलेला दिसून येतो. वा. लं. कुलकर्णी समीक्षा लेखन करताना आपल्या समीक्षेचे समर्थन करण्याचे सामर्थ्य वा. लं. च्या अंगी आहे. उदाहरणे देऊन आपली समीक्षा सकस व ठामपणे मांडण्याचे कौशल्य वा. लं. च्याकडे दिसून येते. हेच त्यांच्या समीक्षेचे विशेष मला जाणवले. समीक्षा करत असतानाच वा. ल. ना वाड;मय क्षेत्रामध्ये दोन प्रकारचे समीक्षक दिसले. जबाबदार टीकाकार व बेजबाबदा टीकाकार अशा दोन वर्गात समीक्षकांची विभागणी वा. ल. नी केली. वाड;मयकृतीचे लेखन करीत असताना लेखकाने घेतलेल्या परिश्रमाचा उल्लेख वा. ल. करतात. उदा:- कोल्हटकरांच्या लेखनामागे

वाड;मयविषयीची प्रचंड आस्था होती. चिंतन होते. त्यांचा जन्म नेहमी अभ्यासातून होत होता. कोल्हटकरांनी त्यासाठी घेतलेले परिश्रम त्यातील शब्दांशब्दांतून व्यक्त होते.

समीक्षेची मांडणी ही अतिशय पध्दतशीरपणे सुलभ भाषेचा वापर करुन केलेली आहे. वाड;मयकृतीचे समीक्षण करताना लेखकाच्या मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न वा. ल. करतात. मानसशास्त्राचा आधार घेतात. समीक्षा लेखन करताना दुजाभाव केलेला नाही. समीक्षेचा उद्देश म्हणजे वाड;मय विकास व्हावा. समीक्षेच्या पाठीमागे चिंतनशीलता, मनन अभ्यास हा पाया दिसून येतो. या पायाआधारे आपली समीक्षा भक्कम करण्याचा प्रयत्न करतात. समीक्षा करता करता आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. समीक्षा ही विचारपूर्वक केलेली आहे. आस्थेने व जिव्हाळ्याने समीक्षा केलेली दिसून येते. कालखंडापरत्वे समीक्षकांच्या मतांमध्ये बदल होतो हे सिध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वाड;मयप्रकाराबद्दल वाटणारी टोचणी व खंत व्यक्त केलेली आहे. समीक्षेमध्ये उपमा देऊन समीक्षेमध्ये नाविण्य आणलेले आहे. वाचकमनामध्येही उतरण्याचा प्रयत्न केला आहे. वाड;मयीन लेखकांच्या उत्कृष्ट गुणांची वा. ल. मनापासून दाद देतात. पाश्चात्य समीक्षा व पाश्चात्य साहित्याचा अभ्यास करतात. मराठी वाड;मयातील इतर समीक्षेचाही अभ्यास सखोलपणे केलेला आहे. जिज्ञासू वृत्तीतून केलेली आहे. समीक्षेमध्ये अनौपचारिक भाषेचा वापर केलेला आहे. आपण केलेल्या समीक्षेमुळे कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता वा. ल. कुलकर्णी घेतात. आपल्या समीक्षेतील अपूर्णत्वाविषयी कबुली देण्याचा नम्रपणा करतात. समीक्षा करण्यापूर्वी कच्ची टिपणे वा. ल. ची काढण्याची पध्दत दिसून येते. निर्भिडपणे व ठामपणे आपली समीक्षाविषयक मते मांडलेली आहेत. समीक्षा केवळ करत नाहीत तर त्या समीक्षेचे समर्थन करण्याचे कौशल्य ही वा. ल. च्या अंगी दिसून येते. इत्यादी गुण-वैशिष्ट्ये वा. ल. च्या समीक्षा लेखनातून दिसून येतात.

*********

## संदर्भ टीपा

१) वाड;मयीन मते आणि मतभेद, पृष्ठ क्र. १

२) तत्रैव पृष्ठ क्र. १६

३) तत्रैव पृष्ठ क्र. १२३

४) वा. ल. कुलकर्णी वाड;मयीन टीपा आणि टिप्पणी १९७५, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ७, पहिली आवृत्ती पृष्ठ क्र. २

५) वा. ल. कुलकर्णी श्रीपाद कृष्ण वाड;मयदर्शन, पॉप्लूलर प्रकाशन १९७५, ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई ४०० ०३४. पृष्ठ क्र. ३०